# बृहन्मुंबई महानगरपालिका

क्र.प्रअचौ/मुख्यालय/8114
दिनांक-05.02.2016

खात्यांतर्गत सर्वंकष (चौकशी) मध्ये सादरकर्ता अधिकारी (Presenting Officer) ची कार्यपद्धती थोडक्यात खालील प्रमाणे नमूद करण्यात येत आहे.

- एखाद्या कर्मचाऱ्याविरूद्ध केलेल्या गैरवर्तवणूक व गैरवर्तनांच्या असे जेव्हा शिस्तभंग प्राधिकरणाचे मत असेल तेव्हा त्या आरोपाचा खरेपणा पडताळण्यासाठी ते प्राधिकरण स्वत: चौकशी करू शकेल किंवा तसे करण्यासाठी एखाद्या चौकशी अधिकाऱ्याची नियुक्ती करू शकेल.

- महानगरपालिका कर्मचाऱ्याविरुद्ध चौकशी करण्याचे प्रस्तावित केले असेल त्यासंबंधित शिस्तभंग प्राधिकरण स्वत: गैरवर्तवणूक व गैरवर्तनांच्या आरोपाबाबत दोषारोपाच्या बाबी निश्चित व सुस्पष्ट स्वरूपात तयार करून दोषारोपाच्या प्रत्येक बाबीच्या पुष्ट्यर्थ आरोपांचे विवरणपत्र तयार करून महानगरपालिका कर्मचाऱ्याने दिलेली कोणतीही कबूली व कबूलीजबाब यासह वस्तूस्थितीबांबीचे विवरण आणि कागदपत्रांची यादी, साक्षीदारांच्या याद्या सदर विवरणपत्रात सोबत समाविष्ट असतील.

- शिस्तभंग विषयक प्राधिकरण आरोपित कर्मचाऱ्याकडे दोषारोपांच्या बाबींची प्रत गैरवर्तवणूकीच्या किंवा गैरवर्तनाच्या आरोपांचे विवरणपत्र आणि कागदपत्रांची यादी/साक्षीदारांची यादी देण्याची व्यवस्था करेल आणि एका लेखी नोटिशीव्दारे व त्या नोटिशीत नमुद करण्यात येईल त्या मुदतीत सदर कर्मचाऱ्याने आपले लेखी निवेदन, व्यक्तीश: निवेदन, जबाब समक्ष अधिकाऱ्यांना सादर करण्याची त्याची इच्छा आहे किंवा कसे हे नमूद करावे असे त्यास निर्देश देण्यात येतील.

- बचावाचे लेखी निवेदन मिळाल्यावर शिस्तभंग विषयक प्राथिकरण दोषारोपांच्या ज्या बाबी कबूल केलेल्या नसतील अशा बाबीची स्वत: चौकशी करेल किंवा त्या प्रयोजनासाठी चौकशी प्राधिकरणाची/चौकशी अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याची गरज आहे असे वाटल्यास नियुक्ती करण्यात येईल. आणि दोषारोपांची कबूली दिली असल्यास शिस्तभंग विषयक प्राधिकरण त्यांना योग्य वाटेल तो पुरावा ग्राह्य मानून दोषारोपावरील त्यांचे निष्कर्ष नमूद करेल व पुढील कार्यवाही करेल.

- महानगरपालिका कर्मचाऱ्याने त्याच्या बचावाचे कोणतेही लेखी निवेदन सादर केले नसेल तर शिस्तभंग विषयक प्राधिकरणांस स्वत: दोषारोपाची चौकशी करता येईल किंवा त्या प्रयोजनासाठी शिस्तभंग विषयक प्राथिकरणाची/चौकशी अधिकाऱ्याची नियुक्ती करता येईल.

- ज्याबाबतीत शिस्तभंग विषयक प्राधिकाऱ्याने चौकशी अधिकाऱ्याची नियुक्ती केली असेल त्याबाबतीत शिस्तभंग विषयक प्राधिकारी आदेश काढून दोषारोपाच्या बाबीच्या पुष्ट्यर्थ चौकशी प्राधिकाऱ्यापुढे प्रकरण सादर करण्यासाठी 'सादरकर्ता अधिकारी' (Presenting Officer) म्हणून मनपा कर्मचाऱ्याची नेमणूक करू शकेल.

- खात्यांतर्गत चौकशी पूर्ण झाल्यानंतर चौकशी प्राधिकरण / चौकशी अधिकारी चौकशीचा अहवाल तयार करतील व सदर अहवाल शिस्तभंग विषयक प्राधिकरणाकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करतील.

- प्रत्येक प्रकरणात सादरकर्त्या अधिकाऱ्याची नियुक्ती करणे अनिर्वाय नाही तरी प्रत्येक प्रकरणात सादरकर्त्या अधिकाऱ्याची नियुक्ती करणे योग्य ठरेल कारण सादरकर्त्या अधिकाऱ्याची नियुक्ती केल्यामुळे विभागीय चौकशीचे कामकाज समाधानकारकरित्या चालवण्यास मदत होईल. सादरकर्ता अधिकाऱ्याच्या अनुपस्थितीमुळे चौकशी प्राधिकारी शिस्तभंग विषयक प्राधिकाऱ्याच्या वतीने प्रकरण सादर करण्याच्या सहाय्यास व बचावाच्या साक्षीदाराच्या उलटतपासणीच्या सहाय्यास वंचीत होईल.

- जेथे शिस्तविषयक नियमात सादरकर्त्या अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याची विनिर्दीष्ट तरतूद नसेल तेथेही शिस्तभंग विषयक प्राथिकाऱ्याने चौकशी प्राधिकाऱ्यापुढे प्रकरण सादर करण्यासाठी सादरकर्त्या अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याचा विचार करावा.

- ज्या अधिकाऱ्याने एखाद्या प्रकरणाचे अन्वेषण केले असेल आणि जो साक्षीदार सुद्धा असेल त्याची सादरकर्ता अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येऊ नये.

- सादरकर्ता अधिकाऱ्याची नियुक्ती झाल्येल्या अधिकाऱ्याने चौकशीच्या ओघात उपस्थित केलेल्या साक्षिदारांची उलटतपासणी करणे हे त्याचे प्राथमिक कार्य असेल. तसेच प्रारंभिक चौकशीत कबूल न केलेल्या वस्तूस्थिती विषयक घटकांची वर्गवारी करणे व ते सिद्ध करण्यासाठी आवश्यक असलेला पुरावा सादर करून चौकशी अधिकाऱ्यास मदत करणे कागदपत्रे/ साक्षीदार यांची तपासणी करणे, दोषारोपाच्या पुष्ट्यर्थ तर्कसंगत पद्धतीने पुरावा सादर करणे त्याचप्रमाणे बचावाच्या पुष्ट्यर्थ सादर केलेल्या साक्षिदारांची उलट तपासणी करणे, सर्व कागदोपत्री/ साक्षीपुरावे अभिलेखीत झाल्यानंतर चौकशी अधिकाऱ्यासमोर तोंडी युक्तीवाद करणे किंवा लेखी टाचण सादर करून त्याची प्रत कसुरदार कर्मचाऱ्यास देणे.

| | |
|---|---|
| सही/- 05.02.2016 | सही/- 05.02.2016 |
| प्रमुख अधिकारी (चौकशी) | उप आयुक्त (सा.प्र) |

Minal pc/d/monthly Meeting 16.1.2016